**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, NOV-DEC, 2018, VOL- 6/48*

# बहुजन शिक्षण उद्धारक : लोकराजा राजर्षी शाहू महाराज

**प्रा. योगेश खंडेराव पाटील**

*सहाय्यक प्राध्यापक, अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर, पुणे – ०९*

**Abstract**

*पिढ्यानपिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाची अवनीती थांबवण्यासाठी शिक्षणासारखा दुसरा पर्याय नाही हे ओळखणारे लोककल्याणकारी, लोकाभिमूख व प्रजाहितदक्षक राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी पर्यायाने त्याच्या उद्धारासाठी अनेकविध प्रयत्न केले. आपल्या सामाजिक सुधारणांचा केंद्रबिंदू शिक्षणाला मानून त्या माध्यमातून सामान्य जनतेच्या हिताचा मार्ग सुकर करणाऱ्या व त्यासाठी आपल्या राजगादीचा पुरेपूर वापर करणाऱ्या शाहू महाराजांना 'शिक्षण प्रेमी राजा' म्हणून संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो. बहुजनांना उच्चवर्गीयांच्या श्रेणीत आणण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक धाडसी व क्रांतीकारक निर्णय घेवून बहुजन उद्धाराचा मार्ग सुकर केला.*

***मुख्य शब्द :*** *बहुजन, शिक्षण, शाहू महाराज, उद्धार.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

महात्मा फुले यांनी शिक्षणाची महती 'विद्येविना मती गेली' या सुप्रसिद्ध उक्तीत सांगितली होती. समकालीन समाजसुधारकांनी 'शिक्षण' ही समाज विकासाची गुरुकिल्ली मानली होती. बहुजन समाज अनेक शतके या शिक्षणापासून वंचित राहिला होता. त्यामुळेच तो अज्ञान, दारिद्र्य व अंधश्रद्धेच्या विटोळ्यात पूर्णपणे गुरफटला होता. बहुजन समाजाला दारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे कोणतेच साधन नाही हे ओळखलेल्या शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी आपल्या राजगादीचा पुरेपूर वापर केला. बहुजन समाजासाठी शिक्षणाच्या विविध सोयी करीत असताना आलेल्या सामाजिक, राजकीय, समस्यांना न डगमगता त्यांनी बहुजन उद्धाराचे व्रत शेवटपर्यंत मोठ्या श्रद्धेने पूर्ण केले. समकालीन सामाजिक स्थिती व राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा पुढील मुद्यांच्या आधाराने घेऊ या.

**समकालीन सामाजिक स्थिती :**

बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अठराविश्वे दारिद्र्य होते. संस्थानात मोठ्या प्रमाणात बहुजनांना अस्पृश्य म्हणून हिनवले जात होते. शिक्षणाच्या सोयी त्याच्यासाठी उपलब्ध नव्हत्या. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची उन्नती करता येते याची जाणीव ही त्या काळच्या बहुजनांना नव्हती. स्वतःला उच्चतम समजणाऱ्या समाजाकडून कळत न कळत अनेकविध अत्याचार अन्याय व अपमान सहन करुन जीवन व्यतीत करणे हे त्याच्या जीवनाचे सुत्र बनले होते. 'वेदोक्त प्रकरणात' स्वतः शाहू महाराजांना या संबंधीचा अपमान सहन करावा लागला होता. जेव्हा शाहू

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली तेव्हाही त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये एका विशिष्ट वर्गातील लोकांचे प्रमाण जास्त असल्याचे त्यांना जाणवले होते. बहुजन समाजाच्या विकासासाठी त्यांना शिक्षण देण्याशिवाय तरणोपाय नाही हे त्यांच्यातील क्रांतीकारक समाज सुधारकाने जाणले होते. यासाठी त्यांनी समविचारी लोकांना हाताशी धरुण पुढील काळात शिक्षणक्षेत्रात अनेक क्रांतीकारक निर्णय घेऊन अंमलबजावणी केली.

**सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा :**

१८५४ वुडच्या शिक्षण पद्धतीने शिक्षणासाठी सर्वांना दारे खुली झाली असे जरी सर्वांना वाटत असले तरी ही सर्व भोळी समजूत होती. शिक्षणाचा खरा कायदा हा वर्णश्रेष्ठींनाच होत होता. सरकार जरी हतबल असले तरी त्याचा राज्यकारभार सांभाळण्यासाठी आवश्यक नोकरदार वर्ग निर्माण होणार असल्याने त्यांनी याबाबत सुधारणा करण्यासाठीचा रस दाखविला नाही. महात्मा फुले यांच्याप्रमाणेच शाहू महाराजांचा शिक्षणातील 'जिरपण्याच्या सिद्धांतावर' अजिबात विश्वास नव्हता. त्याचप्रमाणे इंग्रज सरकारकडून त्याकाळात दोन प्रकारच्या शाळा चालविण्यात येत उच्चवर्णियांसाठी 'स्पृश्य शाळा' व दुसरी बहुजनांसाठी 'अस्पृश्य शाळा' या अस्पृश्य शाळा फक्त शहरातच असत व त्यांची संख्या सुद्धा फारच कमी असत. उदा. पुण्यात फक्त एकच अस्पृश्य शाळा होती. या सर्व पार्श्वभूमीवर २५ जुलै १९१७ रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा निर्णय घेतला व ४ मार्च १९१८ पासून त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. संस्थनातील प्रत्येक खेड्यात एक शाळा असावी यासाठी गावात देवालय बांधताना शाळेसाठी सोपा बांधावा यासाठी आदेश देण्यात आला. शाळेसाठी खर्च कमी पडू नये यासाठी मंदिराचे उत्पन्न शाळेला द्यावे याबाबत सूचना दिली. तसेच सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या आदेशाचे पालन करणाऱ्या पालकांना दर महिना एक रुपया दंडही ठरविण्यात आला. अर्थात हा दंड ठेवण्यामागे सर्वांनी प्राथमिक शिक्षण घ्यावे यासाठीची तळमळ लक्षात येते.

**शिक्षण क्षेत्रातील अभिनव प्रयोग :**

१९१२ मध्ये महाराजांनी प्रत्येक खेड्यात एक प्राथमिक शाळा व्हावी यासाठी मंदिरे, धर्मशाळा किंवा पार या ठिकाणी शाळेची जागा निश्चित केली. सक्तीच्या मोफत शिक्षणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीची ही पूर्व तयारीच म्हणावी लागेल. महाराजांना फक्त सही पुरते शिक्षण मान्य नव्हते. शिक्षणाने माणूस साक्षर नाही तर शहाणा झाला पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यासाठी १९०३ साली 'ओब्रायन टेक्नीकल स्कूल' 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिरची स्थापना' केली. अस्पृश्यांसाठी वेगळ्या असणाऱ्या शाळा बंद करुन सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित शिकावे याबाबत कायदा करण्यात आला. संस्थानातील कारभार व्यवस्थित चालविण्यासाठी प्रशिक्षित तलाठी व पाटील निर्माण करण्यासाठी 'प्रशासकीय शाळा' सुरु केल्या. हुशार व प्रशिक्षित शिक्षकांची भरती शाळेमध्ये करण्यासाठी शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्रे संस्थानात उभी केली. बहुजन समाजातील मुलांना धर्मशास्त्राचे ज्ञान मिळावे यासाठी 'सत्यशोधकी शाळा' स्थापल्या.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी श्री शिवाजी वैदिक विद्यालयाची सुरुवात त्यांनी केली. शिक्षणक्षेत्रातील त्यांनी स्थापलेल्या विविध प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेमागील महाराजांची शिक्षणाबद्दलची दूरदृष्टी दिसून येते.

**आर्थिक तरतुद व शिष्यवृत्तीच्या माध्यमातून प्रोत्साहन :**

शाहू महाराजांनी सुरु केलेल्या शैक्षणिक कार्याने संस्थानावर मोठा आर्थिक भार पडत होता. अशा वेळी सर्व श्रीमंत व व्यापारी वर्गावर शिक्षणकर आकारायला सुरुवात केली. तसेच गावातील मंदिरातील दानाचा उपयोग शिक्षणासाठी करण्याबाबत सूचना दिल्या कोल्हापूर संस्थानाकडून पंढरपूरच्या देवस्थानाच्या नैवेद्यावर होणारा खर्च कमी करुन शिक्षणावर करावा असा आदेश त्यांनी दिला हे सर्व करीत असतानाच अस्पृश्य वर्गातील गुणवान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमाने प्रोत्साहन देण्याचे ही कार्य चालू होते. ७ एप्रिल १९११ रोजी अस्पृश्य लोकांची गरीबी ध्यानात घेवून त्याच्या शिक्षणास उत्तेजन देण्यासाठी पुस्तके, पाट्या, पेन्सिल मोफत देण्यासाठी अडीच हजार मंजूर करण्यात आले. महाराजांनी तयार केलेल्या तलाठी वर्गास दर महिना आठ रुपये शिष्यवृत्ती देण्यात येत होती. बहुजन समाजात महाराजांना अपेक्षित असणारी क्रांती घडवून आणण्यासाठी घेतलेला शिक्षणाचा वसा मोठ्या निष्ठेने पूर्ण करण्यासाठी जी शिक्षणाची चळवळ कोल्हापूर संस्थानात सुरू केली होती. ती फक्त आपल्या संस्थानापुरतीच मर्यादित न ठेवता संस्थांना बाहेर मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर, नागपूर, पंढरपूर कराची यासारख्या ठिकाणी बहुजन समाजासाठी शिक्षणाचे कार्य करणाऱ्या अनेक शिक्षणसंस्था, वसतिगृहांना त्याकाळी शाहू महाराजांनी हजारो रुपयांच्या देणगी स्वरुपाने देऊन बहुजन समाजातील सद्गुणी रोपट्यांना आपल्याा संस्काराने व धनदौलतीचे खतपाणी घालून महाराजांनी मोठे केले.

**वसतिगृहाची जननी कोल्हापूर :**

छत्रपती शाहू महाराजांच्या विविध प्रयत्नांना यश येत होते. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असल्याने शिकणाऱ्यांची संख्या वाढत होती. मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची इच्छा असूनही कोल्हापूर सारख्या ठिकाणी राहण्याची खाण्याची सोय नसल्याने अडचणी येऊ लागल्या यावर उपाय म्हणून महाराजांनी वसतिगृहाची स्थापना करण्याचे ठरविले. सुरुवातीच्या काळात एकच वसतिगृह सर्वांसाठी स्थापण्यात आले मात्र त्याचा फायदा उच्चवर्णीयांना होताना दिसला व समाजावर स्पृश्य असृश्यांचा पगडा असल्याने वसतिगृहातही भेदाभेद सुरु झाले. त्यामुळे महाराजांनी प्रत्येक जातीसाठी वेगळे वसतिगृह काढण्याचे ठरविले त्यानुसार मराठा, मुस्लीम, जैन, ब्राह्मण, वाणी, शिंपी, कोळी, महार, मांग, ढोर, चांभार अशा विविध जातीधर्मासाठी वसतिगृहे उभी करुन महाराजांनी विविध जातीमध्ये शिकण्याची स्पर्धाच सुरु केली. त्याकाळात जगातील कोणत्याच शहरात एवढ्या मोठ्या संख्येने वसतिगृहे नसल्याने कोल्हापूरला ‘मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस’ असा लौकिक प्राप्त झाला.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**समारोप :**

माणसावर शिक्षणाच्या माध्यमातून संस्कार झाल्याशिवाय माणसांत माणुसकी निर्माण होत नाही. बहुजन समाजाला ज्ञानी करुन महाराजांना रयतेचे हित साधायचे होते म्हणून त्यांना 'रयतेचा राजा' ही पदवी शोभते. महाराजांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या भरीव कार्यामुळे बहुजन समाजाच्या विद्यार्थी संस्थेत महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर सन १८९४ ते सन १९२२ या काळात झालेली वाढ खालील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

| अ.क्र. | तपशील | १८९४ | १९२२ |
|---|---|---|---|
| १. | एकूण शाळांची संख्या | २२४ | ५५९ |
| २. | एकूण विद्यार्थी संख्या | १०८४४ | २७,८३० |
| ३. | ब्राह्मणेत्तर विद्यार्थी | ८०८८ | २१,०२७ |
| ४. | अस्पृश्य विद्यार्थी | २३४ | २१६२ |
| ५. | विविध वसतिगृहातील विद्यार्थी संख्या | ११८ | ३२१ |
| ६. | मुलींच्या शाळांची संख्या | २५ | ३३ |
| ७. | शिक्षणावरील एकूण खर्च रुपयामध्ये | १ लाखापेक्षा कमी | ३ लाखापेक्षा जास्त |

संदर्भ : पवार जयसिंगराव संपादित (२००१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ : पान क्र. ५९८

छत्रपतीची बहुजन समाजासाठी घेतलेले परिश्रम व त्याची तळमळ पाहून त्याचा परिणाम महाराजांच्या विचाराला मानणाऱ्या अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्यावर झाला. त्याच्या कार्याची प्रेरणा घेऊन महाराष्ट्राच्या काना–कोपऱ्यातील कार्यकर्त्यांनी राज्याच्या अविकसित व मागास भागात विविध शैक्षणिक संस्था काढल्या त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब हिरे, डॉ. पंजाबराव देशमुख, बापूजी साळुंखे, मामासाहेब जगदाळे या सर्वांच्या अथक प्रयत्नामुळे शिक्षणसंस्थांचे जाळे महाराष्ट्रभर उभे राहिले. त्यातून बहुजन समाजाची मुले जिद्दीने शिकून पुढे गेली व महाराष्ट्रातील व देशातील अनेक महत्त्वाच्या पदावर विराजित झाली. शाहू महाराजाच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रगतीला वेगळी कलाटणी मिळाली. बहुजनांचा उद्धार झाला. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांना बहुजन उद्धारक म्हटले जाते.

**संदर्भ :**

*गौतम प्रज्ञावंत (संपादित) (१९९१) शाहू राजा, कोल्हापूर, अंजीश कमर्शिअल आर्ट प्रिंटर्स.*
*घाटगे राजेंद्र (२००६) राजर्षी शाहू महाराजांच्या स्फूर्तिकथा कोल्हापूर चैतन्य प्रकाशन.*
*जाधव रमेश (१९९७) लोकराजा राजर्षी शाहू, शुक्रवार पेठ, पुणे, सुरेश एजन्सी.*
*देवाळे रा. रा. पाटील मा. दो. (१९७४) राजर्षी शाहू महाराज, पुणे ३०, नितीन प्रकाशन.*
*भगत रा. तु. (१९७८) वदले शाहू छत्रपती, कोल्हापूर, चैतन्य प्रकाशन.*
*साळुंखे नानासाहेब (२०१६), शाहूंच्या आठवणी, कोल्हापूर, वरद ऑफसेट.*
*साळुंखे हिंदूराव (१९९८) शाहू छत्रपती स्मृतीदर्शन, कोल्हापूर, राजहंस प्रिंटिंग प्रेस.*
*पवार जयसिंगराव, संपादन (२००१) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, इंडिया प्रिंटिंग वर्क्स.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*